झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

जा.क्र.झोपुप्रा./तां.१/१४०४/२०२३

दिनांक : ३१/०७/२०२३

४३३
३१/०७/२०२३

## झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र-अंतिम योजना

(विशेष नियमावली, २०१४ मधील नियम क्र. एस. आर. ४(५) अन्वये योजनेस प्रशासकीय मान्यता)

प्रस्तावना :

१. मौजे पर्वती स.नं.१३५ फा.प्लॉट क्र-२८ सदाशिव पेठ, पुणे झोपडपट्टी संदर्भात १५५४५.३९ चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.केदार व्हेंचर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२६/०२/२०१६ रोजी सदर मिळकतीवरील ७० टक्के झोपडीधारकांच्या संमतीसह प्रस्ताव दाखल करणेत आला आहे.

२. सदर प्रकरणी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ नुसार खालीलप्रमाणे विहित कार्यवाही पार पाडली आहे.

अ) उक्त अधिनियमाचे कलम ३क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-३/सदाशिव पेठ/६००/२०१९ दि.१५/०६/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत.

आ) उक्त अधिनियमाचे कलम ३ड अन्वये झोपडपट्टी निमूर्लन आदेश अद्याप पारित झालेले नाही .

इ) झोपडीधारकांची दि. १२/१०/२०२१ रोजीची सक्षम प्राधिकारी यांनी प्रमाणीत केलेली अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट – २) दि. १२/१०/२०२१ प्रसिध्द करण्यात आली आहे.

३. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फत दि.०१/०६/२०२३ रोजी उक्त नियमावलीतील नियम क्र. ४(३) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना" सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रारूप योजने संदर्भात प्राप्त दावे/हरकत/सुचना संदर्भातील स्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ. सदर मिळकतीवरील कोणत्याही झोपडीधारकाची विहीत मुदतीत सदर प्रारुप योजनेसंदर्भात लेखी हरकत/सुचना अथवा तक्रार या प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही.

४. सदर प्रारुप योजनेसंदर्भात सर्व संबधितांचे म्हणणे व दाखल असलेली कागदपत्रे आणि पुरावे विचारात घेऊन या प्राधिकरणामार्फत सदर क्षेत्रासबधीत उपलब्ध केलेल्या प्रारूप योजनेस उक्त नियमावलीतील नियम क्र. एस.आर. ४(५) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.



Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

प्रारुप योजनेमध्ये नमूद बाबीं खालील बाबी समाविष्ट करण्यास/ बदल करण्यास अनुमती देण्यात येत आहे.

अ) विकसक यांचे दि.२६/०७/२०२३ च्या पत्रात नमूद नुसार सदर योजनेत सरकारी नाला / ओढा बाधित होणाऱ्या एकूण १०६ पात्र निवासी झोपडीधारकांपैकी ७५ पात्र निवासी झोपडीधारकांचे पुनर्वसन स.नं.१३५, फा.प्लॉ.क्र.५८६, पर्वती, पुणे या योजनेत करण्यात आले असून, उर्वरित पात्र (१०६-७५=३१) झोपडीधारकांचे पुनर्वसन सदर योजनेत करण्याचे योजिले असल्याचे कळविले आहे.

ब) सदर योजनेतील मुळ जागेवरील झोपडीधारकांची पात्रता यादी दि. १२/१०/२०२१ नुसार एकूण निवासी (५०३ पात्र+ १३३ अपात्र) व बिगरनिवासी (३५ पात्र + २० अपात्र) आणि सरकारी नाला / ओढा बाधित झोपडीधारकांची पात्रता यादी दि.१०/११ /२०१७ नुसार एकूण निवासी (१०६- ७५=३१ पात्र+ १४ अपात्र) व व बिगरनिवासी (०९ पात्र + ०१ अपात्र) असे एकूण सदर योजनेत ६८१ निवासी व ६५ बिगरनिवासी असे प्रस्तावित करणे आवश्यक आहे. तरी विकसक यांनी आता योजनेत एकूण ६४० निवासी व ५४ बिगरनिवासी प्रस्तावित केले आहेत. भविष्यात अपात्र पैकी पात्र होणाऱ्या (४१ निवासी + ११ बिगरनिवासी ) पैकी झोपडीधारकांचे पुनर्वसनाची जबाबदारी हि पूर्णपणे विसकाची असेल.

५. या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात आदेश स्वतंत्रपणे पारित करण्यात येतील. सदरच्या अंतिम योजनेमध्ये प्रसंगानुरूप आवश्यक असल्यास बदल करण्यात येतील.

६. सदर योजनेद्वारे विकसक मे.केदार व्हेंचर्स यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून विकसक यांनी उक्त अधिनियमातील व उक्त नियमावलीतील तरतूदीस अधिन राहून सदर योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले व्यवस्थापन व होणारा सर्व खर्च करणेची संपूर्ण जबाबदारी विकसकाची आहे.

७. सदर योजनेचे विकसक मे.केदार व्हेंचर्स यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील व या संदर्भातील शासनाने तसेच प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करणे विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.

सदरची अंतिम योजना ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह जारी करण्यात आली असून प्रस्तुतचा निर्णय हा सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- ३१ /०७/२०२३

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
31.7.2023

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका.

२. झोपुप्रा पुणे कार्यालयातील विभाग
- सक्षम प्राधिकारी क्र.१
- सहा. निबंधक सहकारी संस्था -सदर प्रकरणी सहकारी संस्था नोंदणी प्रक्रिया चालू करावी.
- संगणक शाखा - सदर आदेशास संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात यावी.

३. विकसक - मे.केदार व्हेंचर्स, बिल्वकुंज अपार्टमेंट, भांडारकर रोड ,पुणे ४११००४ , यांना योजना स.नं.१३५ फा प्लॉट क्र २८ सदाशिव पेठ, पर्वती, पुणे नुसार प्रशासकीय मान्यतेची प्रत कार्यवाहीसाठी.

tion Authority
epartment
ROVED
ri-Chinchwad Area